श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## : विषय:

**खाजगी वातानुकूलीत बस भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत.**

---

दि. ०५ मे,२०२६ अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्त न्यासातर्फे भाविकांना विनामूल्य बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण २० खाजगी वातानुकूलीत बस (२० सीटर बस) भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे.

---

| | |
|---|---|
| दरपत्रके सुचना प्रसिध्दीचा वार व दिनांक | – मंगळवार, दि. २१ एप्रिल, २०२६ |
| दरपत्रके स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – शनिवार, दि. २५ एप्रिल, २०२६, सांय ०५.०० वा. पर्यंत. |
| दरपत्रके उघडण्याचा दिनांक व वेळ | – सोमवार, दि. २७ एप्रिल, २०२६, दु २.०० वा. |
| स्थळ | – श्रीसिध्दिविनायक मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

Vpatil

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)

Tel : 022 - 6249 1111, 022 - 6249 1112 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org



| अ. क्र. | तपशील | पृष्ट क्र. |
|---|---|---|
| १ | दरपत्रके मागविण्यासंदर्भातील अटी व शर्ती (Rules and Regulation) | ३ ते ५ |
| २ | दरपत्रकधारकाबाबतची माहिती (Bidder Particulars) | ६ |
| ३ | तीन वर्षाचे आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र (१० लक्ष पेक्षा जास्त असावे.) सी. ए. यांचे लेटरहेडवर | ७ |
| ४ | दरपत्रकधारकाने (Technical Bid) तांत्रिक लिफाफ्यामध्ये सादर करावयाच्या कागदपत्रांची यादी | ८ |
| ५ | दरपत्रकाचा तपशील BOQ (Proforma for Price Scheduled) | ९ |

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

१. दि. ०५ मे ,२०२६ अंगारक संकष्ट चतुर्थी निमित्त न्यासातर्फे भाविकांना विनामूल्य बससेवा उपलब्ध करून देण्यासाठी एकूण २० खाजगी वातानुकूतिल बस (२० सीटर बस) भाडेतत्वावर मागविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. उक्त कामासाठी तांत्रिक कागदपत्रे (Technical Document) व मूल्य दर (BOQ) असे दोन लिफाफे मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकारांनी तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व मूल्य दर लिफाफा असे दोन वेगवेगळे ए–४ आकाराचे लिफाफे सादर करावयाचे आहेत.

३. ए ४ आकाराचे दोन वेगवेगळे लिफाफे लाखेने सिलबंद करून न्यासास सादर करावे. तसेच लिफाफ्यामधील मुल्य दर व तांत्रिक कागदपत्रांच्या प्रत्येक पानावर दरपत्रकधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे.

४. दरपत्रकधारक हा हिंदू असावा.

५. तांत्रिक कागदपत्रांच्या लिफाफ्यामध्ये पान क्र. ८ नुसार सर्व कागदपत्रे जोडणे बंधनकारक असेल.

६. ज्यादिवशी मोहोरबंद दरपत्रक लिफाफे उघडण्यात येणार आहे त्या दिवशी दरपत्रकधारकाच्या प्रतिनिधिंनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. जर दरपत्रकधारकाचा प्रतिनिधी गैरहजर राहील्यास सदर बैठकीत अटी व शर्तीतमध्ये काही बदल, सुधारणा व शिथिल करण्याचा निर्णय खरेदी उप समितीने घेतल्यास आपणास तो निर्णय मान्य करावा लागेल. याबाबत आपली कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

७. दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत सोबत घेउन येणे बंधनकारक आहे.

८. दरपत्रकधारकारांनी सर्व BOQ मधील सर्व संभाव्य बाबींचा साकल्याने विचार करून (उदा. डिझेल, वाहनचालक व क्लीनर इ.) मूल्य दरामध्ये समाविष्ट करून रक्कम भरावी.

९. दरपत्रकधारकाची फर्म/कंपनी किमान ३ वर्षापूर्वीची असणे आवश्यक आहे.

१०. रविंद्र नाटय मंदिर ते दादर स्थानक, दादर स्थानक ते रविंद्र नाटय मंदिर, रविंद्र नाटय मंदिर ते प्रभादेवी स्थानक व प्रभादेवी स्थानक ते रविंद्र नाटय मंदिर याप्रमाणे बससेवेची मार्गीका असाणार आहे.

११. मंगळवार पहाटे ४.०० वा. पासून ते मंगळवार रात्रौ १२.०० वा. यानुसार एकूण १९ तास बससेवा सुरू असणार आहे.

१२. कंत्राटदाराने वाहनचालक व क्लीनर यांचा अपघात विमा/जीवन सुरक्षा विमा कंपनीने उतरवून घेणे बंधनकारक राहील.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

१३. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या ड्रायव्हर, क्लिनर/कामगार/मजूर यांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील १९२३ तरतूदीचे पालन करणे तसेच यासंबंधाने कामासाठी लावणेत येणाऱ्या कामगारांना किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार द्यावयाचे किमान वेतन, भविष्यनिधी अधिनियम १९५२, (प्राव्हीडंन्ट फंड ॲक्ट १९५२) नुसार प्रशासकीय चार्जेससह भरावी लागणारी अंशदानाची रक्कम तसेच वर्कमॅन कॉम्पेन्सेशन ॲक्ट १९६१ नुसार नुकसान भरपाई वगैरेबाबतच्या सर्व कायदेशीर तरतूदींचे पालन करणे याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. उक्त सर्व कायद्यातील तरतूदींचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

१४. आपल्यामार्फत नेमणुक करण्यात आलेल्या वाहनचालक व क्लीनर कार्यरत असताना कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास अथवा बससेवा सुरू असताना वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारावर राहील. अशा अपघातामुळे समोरील व्यक्ती/वाहन/मालमत्ता अथवा इतर कोणत्याही प्रकारच्या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१५. कंत्राटदाराने याकामासाठी नियुक्त केलेल्या पर्यवेक्षण करणाऱ्या व्यक्तीने न्यास प्रशासनासोबत समन्वय साधणे आवश्यक राहील. सदर व्यक्तीची न्यासाकडून प्रत्येक बसेसकरीता देण्यात येणाऱ्या कार्डवर, बसेसच्या प्रत्येक फेरीनंतर त्याची नोंद घेऊन त्याकार्डवर उपस्थित न्यास कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेण्याची जबाबदारी राहील. कार्डमध्ये नोंद घेताना बस ड्रायव्हरचे पूर्ण नाव, बस सुटण्याची वेळ व बस पोहचण्याची वेळ लिहिणे बंधनकारक राहील.

१६. एखादी बस कमी वेळ चालली, अथवा बसमध्ये बिघाड झाल्यामुळे बंद पडली अशा बसचे देयक अदा केले जाणार नाही. बिघाड/नादुरुस्त झालेल्या बसच्या बदल्यात तात्काळ दुसरी बस देणे बंधनकारक राहील. अन्यथा अपूर्णवेळ चाललेल्या बसचे देयक अदा केले जाणार नाही.

१७. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास L-1 दरपत्रकधारकाराचे काम असमाधानकारक असल्यास आवश्यकतेनुसार L-2 दरपत्रकधारकाराला कार्यादेश देवू शकतो.

१८. दरपत्रक भरतांना मूळ दरामध्ये डिझेल, ड्रायव्हर्स, क्लीनर्स व इतर सर्व प्रकारचे खर्च पकडून (GST वगळून/ Excluding GST) दराची रक्कम भरावी.

१९. कार्यादेशाप्रमाणे काम करीत असलेल्या कामाचे केव्हाही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील.

२०. बिलामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतूदीनुसार आवश्यक ती कर कपात केली जाईल.

## अटी व शर्ती (Ruls and Regulation)

२१. नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२२. दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या कामामध्ये ५% ते १०% काम कमी जास्त प्रमाणात कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील.

२३. दरपत्रकातील नमूद बीड ऑफ कोटेशन (BOQ) व्यतिरिक्त वाढीव काम करणे आवश्यक असल्यास अशा स्वरूपाचे अतिरिक्त काम कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने करण्यात यावे.

२४. ऐनवेळी झालेल्या अतिरिक्त कामाचे प्रदान दरपत्रकधारकाराने दिलेल्या दरानुसारच करण्यात येईल. न्यास प्रशासनाने काम प्रमाणित केल्यानंतर व त्यास मान्यता दिल्यानंतर बिलाची अंतिम रक्कम अदा करण्यात येईल.

२५. कामाचा पूर्ण झाल्यानंतर बिलाची रक्कम आरटीजीएस मार्फत अदा करण्यात येईल. कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२६. कंत्राटाबाबत काही वाद उपस्थित झाल्यास तो प्रथम मुंबई कार्यक्षेत्रातील लवादा (आरबीट्रेशन) मार्फत त्यावरून निवाडा करण्यात येईल. लवादामधील निर्णय अमान्य राहिल्यास मुंबई कार्यक्षेत्रातील न्यायालयाकडे जाता येईल.

२७. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार समितीने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२८. दरपत्रक सुचना अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्याचा किंवा आवश्यक बदलासह फेर दरपत्रके मागविण्याचा पूर्णत: अधिकार न्यास समितीस राहील.

२९. दरपत्रकामधील अटी शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई–निविदा सादर करावी. ई–निविदेसंबंधी काही शंका असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

**अ. श्रीमती. वीणा पाटील, कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९९३०९४२४२८**
**ब. श्री. संदीप राठोड, उप कार्यकारी अधिकारी – मोबाईल क्रमांक. ९३२४९९९०९४**
**क. श्री. जनार्दन शिरवडकर, पर्यवेक्षक – मोबाईल क्रमांक. ९८६७७२०१११**
**ड. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई कार्यालय**
**दूरध्वनी क्र. ०२२–६२४९११११, ०२२–६२४९१११२**

Vpatil
(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकधारकाबाबतची माहिती

दरपत्रकधारक / फर्मचे नांव:————————————————

पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता:————————————————

————————————————

दुरध्वनी क्र. (कार्यालय):———————— (निवास):————————

ई–मेल:————————————————

संपर्कासाठी प्रतिनिधीचे नाव:————————————————

संपर्कासाठी प्रतिनिधीचा मो. क्र:————————————————

कंपनी नोदणी दाखला क्र:————————————————

पॅन कार्ड क्र:————————————————

जी. एस. टी. नोंदणी क्र:————————————————

बॅंकेचे नांव :———————— बॅंक खाते क्र:————————

आय एफ सी कोड:————————

दरपत्रकधारकाची सही व शिक्का

(सी. ए. यांचे लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

महोदय,

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------यांच्या व्यवसायाची वर्ष २०२३–२४, २०२४–२५, २०२५–२६ या आर्थिक वर्षांची उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२३–२४ | |
| २ | वर्ष २०२४–२५ | |
| ३ | वर्ष २०२५–२६ | |
| | **एकूण तीन वर्षाची आर्थिक उलाढाल** | |

दिनांक :– / / २०२६

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही / चार्टर्ड अकाऊटंन्ट
(नाव / सही शिक्का)

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## दरपत्रकधारकाने तांत्रिक व मूल्य लिफाफ्यामध्ये सादर करावयाची कागदपत्रे

**अ) तांत्रिक लिफाफा**

०१. कंपनी नोंदणी दाखला **(महाराष्ट्र दुकाने व आस्थापना किंवा उद्यम रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट) किमान ३ वर्षे**

०२. आयकर नोंदणी पॅन कार्ड

०३. जी. एस. टी. नोंदणी दाखला

०४. दरपत्रकधारकाबाबतची माहिती

०५. सी. ए. यांचे लेटरहेडवर मागील ३ वर्षाच्या आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

**ब) मूल्य लिफाफा**

०१. मूल्य दर

**टिप – दरपत्रक उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे** प्राधिकार **पत्राची प्रत सोबत घेउन येणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रके उघडण्याच्या बैठकीस उपस्थित** राहता येणार नाही याची **नोंद घ्यावी.**

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028
( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## मूल्य दरपत्रक

| दि. ०५ मे,२०२६ (अंगारक संकष्ट चतुर्थी) | | | | |
|---|---|---|---|---|
| अ. क्र. | तपशील | एकूण बस संख्या | प्रति बस दर रुपये | एकूण दर (जीएसटी वगळून) |
| १ | खाजगी वातानुकूलीत बस (२० सीटर बस) डिझेल, वाहनचालक व क्लीनरसह | २० | | |
| | | एकूण रक्कम रुपये | | |

दरपत्रकधारकाची सही व शिक्का